**स.के.नं. १२२७/२०२५**
**नि.क्र.१२/क च्या पुढे**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांचा जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | सचिन भानुदास हासे, |
| वय | - | ४० वर्षे |
| व्यवसाय | - | पोलीस हवालदार/२७५८ |
| राहणार | - | उरण पोलीस ठाणे. |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता पी. बी. देशमाने यांच्याद्वारे**

१. मला आजरोजी पुरावा कामी समन्स मिळाल्याने मी पुरावा देणेकरीता आलो आहे. दिनांक २८.०९.२०२४ रोजी मी उरण पोलीस ठाण्यात कार्यरत असताना बीटमार्शल करताना दुपारी ०३.५९ वाजताच्या सुमारास नियंत्रण कक्ष मुंबई यांचेकडून फोन आला व त्यांनी उरण ते पनवेल रोडवर धुतूम गावाजवळ आयओटीएल कंपनीसमोर मोटर ट्रेलर व आयशर टेम्पो यांचा अपघात झाल्याचे व त्या अपघातात एक इसम गंभीर जखमी असल्याचा अहवाल प्राप्त झाला. त्यामुळे मी व माझेसोबत पोलीस अंमलदार महेंद्र गायकवाड घटनास्थळावर तात्काळ गेलो. तेथे रस्ता विभाजकाच्या बाजूला मोटर ट्रेलर क्र. एमएच ४६-बीएफ-९८३ व आयशर टेम्पो क्र. जीजे १५-एटी-३३५१ यामध्ये अपघात झाल्याचे दिसून आले. त्या टेम्पोमधील चालक हा गंभीर जखमी होता. मोटर ट्रेलरचा चालक सिकंदर रामकेदार यादव याला विचारणा केली असता त्याने सांगितले की, त्याने अचानक ब्रेक दाबल्याने पाठीमागून येणाऱ्या आयशर टेम्पो हा पाठीमागून येऊन धडकल्याने त्याचे केबिन दबुन त्याचा चालक जखमी झाला आहे. त्यानंतर ट्रेलर चालकाकडे विचारणा केली असता त्याने

सांगितले की, ट्राफिकचे अंमलदार यांनी जखमी टेम्पो चालकास ॲम्ब्युलन्सद्वारे उपचाराकरीता घेऊन गेले आहेत. त्यानंतर ट्राफिक अंमलदार यांचेशी संपर्क केला असता त्यांनी सांगितले की, त्या जखमी इसमास दोन्ही पायास व डोक्यास गंभीर दुखापत झाली आहे त्यामुळे तो बोलू शकत नाही. त्यानंतर आम्ही त्या ट्रेलर चालकास ताब्यात घेतले त्याबाबत ठाणे अंमलदार यांना फोनवर माहिती दिली. त्यानंतर ठाणे अंमलदार घटनास्थळावर आले. ठाणे अंमलदार यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यानंतर आम्ही त्या मोटर ट्रेलर चालकास उरण पोलीस ठाण्यात घेऊन जाऊन विचारणा केली. त्याने ब्रेक का दाबला याबाबत सविस्तर विचारणा केली असता त्याने कोणतेही सविस्तर कारण सांगितले नाही. त्यामुळे मी त्याचेविरूद्ध उरण पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. आता मला फिर्याद दाखवली. त्यावर माझी सही असून समक्ष म्हणुन ठाणे अंमलदार यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. करीता फिर्यादला **निशाणी क्र. पी१ पीडब्ल्यू १** देण्यात येतो. आता मला प्रथम खबर दाखवली. त्यावर माझी सही असून समक्ष म्हणुन ठाणे अंमलदार यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. करीता प्रथम खबरला **निशाणी क्र. पी२ पीडब्ल्यू १** देण्यात येतो. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो. तो आजरोजी न्यायालयात हजर नाही. (आरोपी सकाळच्या सत्रात हजर होता परंतु साक्षीदार यांची साक्ष नोंदवतेवेळी आरोपी न्यायालयात हजर नव्हते.)

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री. योगेश गांगण यांच्यामार्फत...</u>**

२. मी फिर्याद देताना आरोपीला उरण पोलीस ठाण्यात घेऊन गेल्याचे सांगितले होते. तसे फिर्यादमध्ये दाखल अधिकारी यांनी लिहून घेतले होते. सदर बाब फिर्यादमध्ये का नमुद नाही याचे कारण मला सांगता येत नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, मी घटना प्रत्यक्ष पाहिली नसून मला तेथे

मिळालेल्या माहितीवरून मी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही घटनास्थळावर गेलो तेव्हा तेथे लोकांची गर्दी होती. हे म्हणणे खरे आहे की, ट्रेलर हा पुढे होता व टेम्पो मागे होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर टेम्पोच्या मागे ब्रेक लावल्याचे निशाण होते. हे मला आठवत नाही की, तसे निशाणी मी ठाणे अंमलदार यांना पंचनामा करतेवेळी दाखवले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी आम्ही केवळ टेम्पोचे फोटो काढले. हे म्हणणे खरे नाही की, मी अपघातासाठी कोणाची चुक होती याबाबत कोणतीही शहानिशा न करता फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही घटनास्थळावर गेलो तेव्हा दोन्ही वाहनात चालक बसलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सिकंदर हा त्या ट्रेलरचा चालक असल्याची एकिव माहिती मी फिर्यादमध्ये दिली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी सिकंदर याला ते ट्रेलर चालवताना मी प्रत्यक्ष पाहिले नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, आरोपी सिकंदर तेथे बसलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी सिकंदर याला घटनेच्या पुर्वी मी ओळखत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी सिकंदर याचेकडे चौकशी केली व त्याने घटना कशी घडली याबाबत मला विस्तृतपणे सांगितल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आयशर टेम्पो हा वेगात होता व त्याला कंट्रोल न झाल्याने अर्जंट ब्रेक लावल्याने तो ट्रेलरवर धडकला. हे म्हणणे खरे आहे की, घटना ही पावसाळाच्या दिवसात घडली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात आरोपीविरूद्ध सांगितलेला मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा या गुन्ह्याशी काही संबंध नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/-**

**उरण,**
**(एस.पी. वानखडे )**

**दिनांक – १२/०६/२०२६**
**न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.१ उरण**